कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/रंगमेळ/प्र.अर्ज/२०२६-२७/१६१६
दि. १४/१०/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या रंगमेळमध्ये काम करण्यासाठी इच्छूक रंगकर्मीकडून विहीत नमून्यातील अर्ज मागवण्यात येत आहेत. यंदापासून दुपारी ३.०० ते ७.०० या वेळेत रंगमेळचं कामकाज सुरु होणार असून सदर अर्ज कार्यालयीन वेळेत, कला अकादमीच्या स्वागतकक्षात उपलब्ध असतील.

नोव्हेंबर २०२६ पासून कला अकादमीची हि रेपर्टरी कंपनी, ४५ वर्षाखालील युवा कुशल नाटयकर्मीसाठी खुली होत असून, श्रेणी II श्रेणी III साठी लागणारी आवश्यकता आणि त्याचे निकष, अर्जासोबत जोडण्यात आलेले आहेत. किमान १ व कमाल पाच वर्षापर्यंत मर्यादित हा करार असणार आहे. आणि पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी दोन दिवसांच्या नाटयविषयक कार्यशाळेचे आयोजन केले जाईल.

या कार्यशाळेतून निवड झालेल्या रंगकर्मीची कलाकार श्रेणी II आणी कलाकार श्रेणी III साठी निवड करण्यात येतील. कार्यशाळेसाठी येणा-या उमेदवारांना प्रवास शुल्क किंवा दैनीक भत्ता देण्यात येणार नाही.

इच्छूक उमेदवारांनी, अर्जासोबत पारपत्रासाठी लागणा-या आकाराचे छायाचित्र, जल्मदाखला, शैक्षणीक प्रमाणपत्र, अनुभव व इतर प्रमाणपत्रांच्या स्वयंप्रमाणित प्रती अर्जासोबत जोडून दिनांक २६ ऑक्टोंबर २०२६ पर्यंत पोचतील या प्रमाणे, सदस्य सचीव कला अकादमी गोवा यांना पाठवणे गरजेचे आहे.

(शंकर बा. गांवकर)
सदस्य सचिव
कला अकादमी गोवा

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)